

ISSN2230-7850 Impact Factor :4.1625 (UIF)Volume - 6 | Issue - 4 | May - 2016

Indian Streams Research Journal





# “धुळे जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितींचा सामाजिक व राजकीय विकास - एक अध्ययन”

डी. एम. टेकाडे[१] , यु. एस. पाटील[२]

[१]राज्य शास्त्र विभाग प्रमुख , भुसावल कला, विज्ञान व पु. ओ. नाहटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ जि. जळगाव.

[२]कै. म.दि.सिसोदे उर्फ भाऊ साहेब , कला व वाणिज्य महाविद्यालय ,नरडाणा ता. शिंदखडा जि. धुळे.

## प्रस्तावना :-

भारत हा कृषीप्रधान देश आहे.देशातील सुमारे ६० टक्के जनता शेतीवर आधारीत उद्योगधंद्यामध्ये सामावलेली आहे.इ.स.१९६८ साली भारतात पहिली हरितक्रांती झाली.त्याचे श्रेय महाकृषितज्ञ व शास्त्रज्ञ डॉ.एम. एस.स्वामिनाथन यांना जाते. त्यामुळे गहू आणि तांदूळ या दोन अन्नधान्यांच्या उत्पादनात लक्षणीय वाढ झाली. त्यामुळेच भारत अन्नधान्यात स्वंयपूर्ण झाला.शेतीतील या क्रांतीमुळे आणि भारताची लोकसंख्या १२५ कोटींपर्यंत पोहोचली तरी आज शेतकऱ्यांचा अथक प्रयत्नांमुळे अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन होऊन भारत अन्नधान्यामध्ये स्वयंपूर्ण झाला आहे.भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे संपूर्ण भारतीय व्यवस्था ही कृषीप्रधान असून भारतीय बाजारपेठा सुध्दा कृषिवरच आधीरत आहेत.भारतीय कृषि रचना ही रोजगार प्रधान असून रोजगाराचे मोठे क्षेत्रसुध्दा कृषिवरच अवलंबून आहे.प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण करण्याची क्षमता आजही कृषि क्षेत्रातच आहे.कारण अप्रत्यक्ष रोजगार हा जरी उद्योगधंद्यातून निर्माण होणारा दिसत असला तरी उद्योगांवर मिळणारा कच्चा माल हा कृषितूनच पुरवला जातो.

भारतातील ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असून त्यांच्या उपजिवीकेचे मुख्य साधन म्हणून शेतीकडे पाहिले जाते त्यांच्या कृषिमालाला रास्तभाव मिळावा हीच त्यांची रास्त अपेक्षा असते. शेतातून उत्पादित माल बाजारपेठेपर्यंत घेवून जाण्यासाठी त्यांच्याजवळ पुरेसे साधन उपलब्ध नसल्यामुळे व माल साठवणूकीसाठी योग्य व्यवस्था नसल्यामुळे शेतकऱ्याला आपला माल व्यापाऱ्याला विकावा लागतो. व्यापारी कमी भावात त्यांचा माल खरेदी करतात.त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते त्यातुन मार्ग काढण्यासाठी सहकारी संस्थांचा जन्म झाला. कृषी उत्पन्न बाजार समिती ही शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी सहकारी तत्वावर स्वतःहून शेतकऱ्यांनी स्थापन केलेली संस्था आहे.

## कृषी उत्पन्न बाजार समितींची ऐतिहासिक पार्श्वभुमी :-

इंग्लडमध्ये १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात औद्योगीक क्रांतीला सुरुवात झाली.नव्या उद्योगधंद्यांना कच्चा मालाची अधिक गरज भासू लागली.१८५० नंतर व्यापारास चालना मिळाली.त्यादृष्टिने अनेक घटना घडल्या.इ.स.१८६१ ते १८६५ या अमेरिकन युध्दामुळे भारतीय कापसाच्या उत्पादनाला चालना मिळाली तसेच निर्यातीलाही जोर आला.इ.स. १८६९ मध्ये सुएझ कालवा वाहतुकीला खुला झाला त्यामुळे भारताच्या परराष्ट्रीय व्यापाराला चालना मिळून इंग्रजानाही भारतातून मोठ्या प्रमाणात कच्चा माल हवा होता तो मिळविण्यासाठी त्यांनी मालाच्या बाजार पेठा स्थापण्यास उत्तेजन दिले.

इ.स.१९२९ साली शासनाने 'रॉयल कमिशन ऑफ ॲग्रीकल्चर' नियुक्त केले.तसेच मुंबई राज्याने बॉम्बे कॉटनमार्केट ॲक्ट-१९२७ मध्ये पास केला.मुंबई राज्य ही मुख्य व्यापाऱ्यांची मोठी बाजारपेठ होती.तेथे व्यापाराची मोठ्या प्रमाणात उलाढाल होत असे.सन १९३९ मध्ये 'बॉम्बे ॲग्रीकल्चर प्रोड्युस ॲक्ट' तयार केला. त्याद्वारे बाजारभावांचे मार्गदर्शन, खरेदीदार, दलाल, मापाडी यांचा वाद मिटविणे, शेतीमालाचा उघड लिलाव करणे या कार्यास अग्रक्रम देण्यात आला.

भारतातील पहिली नियमित बाजारपेठ अकोला जिल्ह्यात कारंजा येथे १८८६ मध्ये स्थापन करण्यात आली यानंतर अनेक प्रातांनी (राज्यांनी) कायदे करून नियमित बाजारपेठा स्थापन केल्या.१९५१ मध्ये संपूर्ण देशात २०० नियमित बाजारपेठा अस्तित्वात होत्या. जानेवारी १९७७ मध्ये नियंत्रित बाजारपेठांची संख्या ३६३० आणि १९८८ मध्ये ६०५० इतकी होती. आज महाराष्ट्र राज्यात २९५ बाजार समित्या व ६०९ उपबाजार पेठा आहेत.

### महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री अधिनियम, १९६३ :-

संपुर्ण महाराष्ट्रात एकच कायदा असावा यासाठी प्रा.दातवाला यांनी १९५० मध्ये व डॉ.शिरणामे यांनी १९५५ मध्ये काही दुरूस्त्या सुचविल्या आणि उच्च न्यायालयाने दिलेले निकाल लक्षात घेऊन महाराष्ट्रात कृषी खरेदी-विक्री नियमन अधिनियम, १९६३ पास केला.

पुर्वी देशात बारा बलुतेदार पध्दत अस्तित्वात होती.त्यामध्ये वेगवेगळया जातीच्या लोकांकडून वेगवेगळे व्यवसाय करण्यात येत होते.त्यानंतर अनेक वर्षे इंग्रजांचे राज्य होते.त्यात इंग्रजांनी विविध प्रकारच्या सुधारणा केल्या.इंग्रजी राजवटीविरूध्द लढा देऊन भारत स्वांतत्र्य झाल्यानंतर १३ वर्षांनी म्हणजेच १ मे १९६० रोजी महाराष्ट्राची स्थापना झाली.राज्याच्या स्थापनेनंतर राज्य कारभारात सुसूत्रता यावी यासाठी अनेक नवीन कायदे करून त्यांची अंमलबजावणी सुरु करण्यात आली.

त्यानुसार सर्व राज्यातील कृषी मालाची खरेदी करण्यासाठी बाजार समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.त्यासाठी स्वतंत्रपणे अधिनियम तयार करण्यात आले.त्यानुसार महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री अधिनियम, १९६३ आणि कृषी उत्पन्न खरेदी विक्री नियम, १९६७ तयार करण्यात आला.त्यापूर्वी मुंबई शेतीच्या उत्पन्न बाजाराबाबत अधिनियम, १९३९ अस्तित्तवात होता राज्य कारभाराच्या दृष्टिने कायद्याचे एकीकरण व्हावे या उद्देशाने वेगवेगळे मार्केट कायद्यांचे एकीकरणासाठी विधेयक क्र. ४६ सन १९६३ मध्ये मांडण्यात आले त्याचे दि. ५ मे १९६४ रोजी कायदा झाला तर २५ मे १९६७ मध्ये त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरु झाली पूर्वी वेगवेगळ्या कायद्यानुसार समित्या अस्तित्वात होत्या त्यांच्या सभासदांची मुदत ही दोन वर्षे होती. ती नंतर एक वर्षे वाढविण्यात आली.आता महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती अधिनियम १९७० नुसार मुदत ५ वर्षांनी वाढविण्यात आली.

### मुंबई विशेष बाजार समिती :-

सध्या राज्यात २९० बाजार समित्या अस्तित्वात आहेत.त्यात प्रत्येक जिल्हा आणि तालुकास्तरावरील बाजार समित्यांसह काही ठिकाणी खाजगी तत्वावरील बाजार समित्या अस्तित्चात आल्या आहेत. त्यात मुंबई बाजार समिती विशेष आहे या बाजार समितीत केवळ मुंबई परिसरातून नव्हे तर संपुर्ण राज्यासह इतर राज्यातूनही धान्य विक्रीसाठी येते त्यामुळे मुंबई बाजार समिती ही विशेष बाजार समिती करण्यात आली.

### बाजार समितींचे नियम :-

देशातील वेगवेगळया राज्यांमध्ये शेती मालाच्या बाजार नियंत्रणाचे कायदे करण्यात आले. महाराष्ट्र राज्यातील वेगवेगळया विभागात सन १९३२ पासून कायदे करण्यात आले ते पुढील प्रमाणे :

१. मुंबईच्या शेतीच्या उत्पन्नाच्या बाजाराबाबत अधिनियम, १९३९
२. मध्यप्रांत व वऱ्हाडच्या शेतीच्या उत्पन्नाच्या बाजाराबाबत अधिनियम, १९३९
३. मध्यप्रांत व वऱ्हाडच्या शेतीच्या उत्पन्नाच्या बाजाराबाबत अधिनियम, १९३५
४.

सन १९३९ च्या फसलीच्या हैद्राबादच्या शेतीच्या उत्पन्नाच्या बाजाराबाबत अधिनियम करण्यात आले बदलत्या परिस्थितीनुसार वेगवेगळे प्रचलित कायद्यामध्ये सुधारणेची जरूरी होती.म्हणून सर्वश्री लाड व शिरनामे समितीची स्थापना करण्यात आली.

### कृषी उत्पन्न बाजार समितीची रचना :-

कृषी उत्पन्न बाजार समिती बाजार क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्था आहे नगरपालिका , ग्रामपंचायतांप्रमाणे ही स्थानिक स्वराज्य संस्था लोकमतानुवर्तीच आहे. तिचे अधिकांश सभासद निवडूकीने अधिकार पदावर येतात कृषी उत्पन्न बाजार समितीत एकुण १८ सभासद असतात.

अ - एकूण सभासदापैकी १० शेतकरी सभासद असतात यांपैकी ७ शेतकरी सभासदांची निवडणुक बाजार समितीच्या क्षेत्रातील कृषी संस्थांचे व्यवस्थापक समितीचे सभासद निवडून देतात.तर ३ सभासद समितीच्या क्षेत्रातील ग्रामपंचायतीचे सभासद निवडून देतात.
ब- १) व्यापारी प्रतिनिधीमधून दोन सभासद निवडले जातात ते दोन प्रतिनिधी अनुशास्तीधारक, व्यापारी, अडते यांनी निवडून दिलेले असतात.
२. हमाल - मापाडी यांचा एक प्रतिनिधी निवडला जातो.
क - प्रक्रिया करणाऱ्या संस्था किंवा खरेदी-विक्री करणाऱ्या संस्थांचा एक सभापती हा सदस्य असतो.
ड- पंचाय समिती खेरीज बाजार समितीचे मुख्य कार्यालय जेथे आहे तेथील स्थानिक प्रशासन संस्थेचा सभापती
फ- जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था किंवा त्यांनी नेमलेला प्रतिनिधी एक सदस्य असतात पण त्यांना मताचा अधिकार नसतो.
ग- विस्तार अधिकारी कापूस कलम १३ (मत अधिकार नाही)

बाजार समितीचा सदस्य म्हणून निवडून येण्यास वयोमर्यादा २१ वर्षे असावी लागते.

### धुळे जिल्ह्यातील बाजार समितीचा सामाजिक व राजकिय विकास :

### १- धुळे कृषी उत्पन्न बाजार समिती -

नियंत्रित बाजारपेठांचा अधिनियम १८९७ मध्ये वऱ्हाड प्रातांत झाला भारतीय मध्यवर्ती कापूस संस्थेत शिफारस केल्यानुसार १९२७ साली मुंबई इलाख्यात कापूस बाजार अधिनियम म्हणून अस्तित्चात आला या शर्तीवर कापसाची सर्वात पहिली नियंत्रित बाजारपेठ १९३० साली धुळे येथे स्थापन करण्यात आली जानेवारी १९७७ मध्ये नियंत्रित बाजारपेठेची संख्या ३६३० तर १९८८ मध्ये ती संख्या ६६५० होती.

महाराष्ट्रात सर्वप्रथम १ सप्टेंबर १९३० साली धुळे येथे मार्केट कमिटीची स्थापना करण्यात आली, तेव्हा ती बाजार समिती स्वायत्त संस्था होती.नंतर या कमिटीचे नाव बदलून कृषी उत्पन्न बाजार समिती करण्यात आली. प्रथम या समितीत कापूस व शेंगा याच वस्तूंची खरेदी विक्री होत असे नंतर टप्प्याटप्प्याने सर्वच माल मार्केटमध्ये विक्रीसाठी येवू लागला पूर्वी या कृषी बाजार समितीच्या प्रमुख सभापतीपदी व्यापारी वर्गाचे प्रतिनिधी होते मात्र ५० वर्षापासून ही प्रथा बदलवून बाजार समितीचा प्रमुखपदी शेतकऱ्यांचा प्रतिनिधी विराजमान होतो धुळे येथे  बाजार समितीची स्थापना झाल्यानंतर दोंडाईचा शिंदखेडा, शिरपूर पुर्वीच्या धुळे जिल्ह्यात असलेल्या नंदुरबार, तळोदा, शहादा, नवापू, अक्कलकूवा, धडगाव आदि ठिकाणीही बाजार समित्या स्थापन झाल्या स्थानिक स्वराज्य संस्थाप्रमाणेच सभासदांमधून निवडून दिलेल्या प्रतिनिधींमार्फत बाजार समितीचा कारभार चालवला जातो.

धुळे बाजार समितीत शेतीमालासह जनावरांचीही विक्री केली जाते.त्यात प्रामुख्याने म्हशीच्या बाजारासाठी धुळे बाजार समिती महाराष्ट्रात प्रसिध्द आहे.दर मंगळवारी धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीत जनावरांचा बाजार भरतो.तसेच राज्यात लासलगाव, पिंपळगाव बसवंत नंतर धुळे बाजार समितीचे नाव कांद्याच्या व्यवहारासाठी प्रसिध्द आहे. दरवर्षी लाखो क्विंटल कांद्याचा व्यवहार होत असतो जिल्ह्यातील उन्हाळी कांद्याला विशेषता दिल्ली, उत्तरप्रदेश, गुजरातमधून मोठ्या प्रमाणावर मागणी येत असते शेकडो ट्रक कांदा दरवर्षी जिल्ह्यातून या राज्यात निर्यात होतो. तसेच काही प्रमाणात विदेशातही हा कांदा पाठविण्यात येतो त्यामुळे धुळयात कांद्यासाठी स्वंतत्र बाजारपेठ निर्माण करण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी अनेक वर्षापासून लावून धरलेली आहे त्याबाबत कारवाई झाल्यास भविष्यात धुळे शहरासाठी कांद्याची बाजारपेठ तयार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच नाफेडतर्फे जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात कांदा खरेदी करण्यात येतो. तसेच कांद्यावर प्रक्रिया करणारा एखादा  प्रकल्प सुरु        झाल्यास अधिक प्रमाणात या ठिकाणी उत्पादन होणाऱ्या कांद्याला चांगला भाव मिळून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न प्राप्त होऊ शकते. याशिवाय धुळे बाजार समितीच्या आवारात हमाल मापाडी यांना विश्रांतीसाठी संघटनेमार्फत माथाडी भवनाची उभारणी करण्यात आली.राज्यात अशा प्रकारच्या भवनाची उभारणी मोजक्यात समितींमध्ये झालेली आहे. ते हक्काने विश्रांती घेऊ शकतात तसेच संघटनेच्या माध्यमातून त्यांच्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन ही केले जाते.

### २. शिरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती -

शिरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना ०१ जून १९४८ साली करण्यात आली असून २४ एकर क्षेत्रात या बाजार समितींचा विस्तार झाला आहे. शिरपूर येथील कृषी उत्पन्न बाजार समिती संपूर्ण खान्देशातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात अग्रगण्य बाजारपेठ म्हणून प्रसिध्द असून फार मोठ्या प्रमाणात भूसार मालाची आवक येथे असून गुरांसह घोड्यांची प्रसिध्द बाजार पेठ म्हणून शिरपूरच्या कृषी उत्पन्न बाजार समितींकडे पाहिले जाते. माजी शालेया शिक्षणमंत्री आ. अमरिशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक वर्षापासून उत्कृष्ट कामकाज सूरू आहे. त्यांची अनेक वर्षापासून बाजार  समितीवर एकहाती सत्ता आहे. बाजार समितीचे विद्यमान सभापती डॉ. डी.बी. पाटील, उपसभापती विनायक पाटील, सचिव गोविंद पाटील व संपुर्ण संचालक मंडळ बाजार समितीच्या प्रगतीसाठी  प्रयत्नशिल असून मोठी बाजारपेठ या ठिकाणी लाभली आहे.

या बाजार समितीत तालुक्यातील १४७ गावांचा समावेश असून  दर सोमवारी आठवडे बाजाराच्या दिवशी गुरांचा बाजार भरतो. यात सर्व प्रकारचे गुरे विक्रीस येतात कृषी उत्पन्न बाजार समितीचे मुख्य बाजाराचे क्षेत्र १०.७३ हे. आर, बोराडी दुय्यम बाजाराचे क्षेत्र ३ हेक्टर, पळासनेर दुय्यम बाजाराचे क्षेत्र ३.२४ हे. आर. आहे. 'अ' वर्गवारी असलेल्या या बाजार समितीत कापूस शेंगा मूग तूर हरभरा , गहू, ज्वारी, बाजरी मिरची, मका अदी प्रमुख पिके घेतली जाऊन त्यांची मोठ्या प्रमाणात आवक होते.

बाजार समितीमध्ये मुख्य कार्यालयाची इमारत असून भव्य संरक्षक भिंतीचे बांधकाम, गटारीचे बांधकाम, शेतकरी निवास, रस्ते डांबरीकरण , गुरांच्या बाजारात तळशेड, धक्का बांधकाम, उपहारगृह, गोडाऊन, शॅपिंग प्लॅटफॅार्म, सॅनेटरी बॅाक, इलेक्ट्रीक भूईकाटा उंच पाण्याची टाकी, हमाल मापाडी विश्रांतीगृह व्यापारी भवन बाजारातील ग्राऊंड लेव्हल व डबर सोलिंग आदि कामे झाली असून  बऱ्याच सुविधा आहेत. शिरपूर बाजार समितीमध्ये शिरपूर शहरातून नव्हे तर धुळे जिल्ह्यासह परराज्यातून म्हशी, बैल, घोडे व अनेक  गुरे विक्रीसाठी येतात येथे अनेक खरेदीदार सुध्दा येतात. शिरपूरच्या प्रसिध्द यात्रेत घोडे व गुरांची विक्रमी विक्री होऊन बाजार समितीला  दरवर्षी चांगले उत्पन्न मिळते. बाजारभाव भरण्याबाबत व इतर दैनंदिन कामकाजासाठी व लेखविषयक कामकाजासाठी संगणक मिळाले असून अधिकारी व कर्मचारी याना कायद्यातील बदल तसेच इतर अनेक अद्ययावत प्रणालीबाबत प्रशिक्षण दिले जाते.

### ३. दोंडाईचा कृषी उत्पन्न बाजार समिती -

पुर्वीच्या संयुक्त धुळे जिल्ह्यातील दहा ही तालुक्यात स्वतंत्रपणे बाजारसमित्या सुरू करण्यात आल्या तर शिंदखेडा तालुक्यातील दोंडाईचा शहरात २० सप्टेंबर १९३९ रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना करण्यात आली. ही बाजार समिती मिरची आणि गुरांच्या खरेदी विक्रीसाठी राज्यात प्रसिध्द आहे येथील मिरचीचे थेट विदेशात मजल मारली आहे.दोडाईचा शहरातून दरवर्षी मिरचीची निर्यात विदेशात होते.येथे मिरचीची मोठ्या प्रमाणात उलाढाल होते. दरवर्षी दोंडाईचा बाजार समितीत गुरे खरेदीसाठी दिल्ली व राजस्थानातील व्यापारी येतात याठिकाणी विशेषता जाफराबादी जनावरांची मोठ्या प्रमाणात उलाढाल होऊन समितीला मोठ्या प्रमाणात लाखोचे उत्पन्न प्राप्त होते तर गुरांच्या बाजारात विविध जातीच्या म्हशी गायींची खरेदी-विक्री होत असते. देशातील विविध राज्यात आढळणाऱ्या गायी म्हशींपैकी विविध जातीची जनावरे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी येतात.याशिवाय दोंडाईचा शहरापासून काही किलोमीटर अंतरावर दादासाहेब रावळ आणि ब्राम्हणे शिवारात केशरानंद या दोन खाजगी तत्वावरील बाजार समितींची स्थापना करण्यात आली आहे.त्यात शेत मालाबरोबरच कापूस खरेदी-विक्री बाबतचे व्यवहार सूरू करण्यात आले आहेत. तसेच भविष्यात या ठिकाणी डाळींचाही व्यवहार सूरू करण्याच्या संचालकाचा मानस आहे अशा प्रकारे खाजगी तत्वावर बाजार समिती सुरू करण्याचा प्रयत्न जिल्ह्यात प्रथमच करण्यात आला आहे त्याला कितपत यश येते हे येणारा काळच सांगणार आहे.

### ४.साक्री कृषी उत्पन्न बाजार - समिती

साक्री कृषी उत्पन्न बाजार समितींची स्थापना २० डिसेंबर १९६२ रोजी करण्यात आली पहिले सभापती म्हणून कै.यशवंत सखाराम पांडुरंग पाटील (भडणे) यांनी काम पाहिले सुरुवातीला केवळ बाजारसमितीत शेतीमालाची खरेदी विक्री होत होती. कालातंराने बाजार समितीने तालुक्यातील पिंपळनेर, निजामपूर आदि ठिकाणी आपला विस्तार वाढविला त्याठिकाणी शेतीमालाचे खरेदी -विक्री चे व्यवहार सुरु झाल्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची सोय झाली. तर सन २०१० मध्ये पोपटराव सोनवणे यांनी कारभार हाती घेतल्यापासून अनेक सुधारणा करीत बाजारसमितीत कांदा भाजीवाल्याचाही व्यवहार सूरू झाला तसेच भुईकाटा स्वतःच्या मालकीचा असून अजून ३ कोटींची प्रस्तावित कामे आहेत त्यात पिंपळनेर येथे शेड, नवीन इमारत, ओटे बांधणे, साक्रीत नवीन इमारत,  क्रॅाक्रीटीकरण, निजामपूरला नवीन इमारत, १३ एकर जागेला संरक्षण भिंती, व्यापारी गाळे बांधणे आदि कामे करण्यात आलेली आहेत. तर जुलै २०११ मध्ये म्हसदी येथे भाजीपाला मार्केट सूरू करण्यात आले आहे त्यामुळे साक्री बाजार समितींचा विस्तार दिवसंदिवस वाढत आहे.

भारतीय कृषि अर्थ व्यवस्थेत आजही शेतकरी सक्षमपणे आपल्या पायांवर उभा राहिलेला नाही स्वत:चा माल, स्वतः विकण्याची त्याची मानसिकता नाही शिक्षणाचा अभाव ही सर्वात मोठी अडचण ठरते. बाजार मूल्य शेतकरी ठरवत नसून व्यापारी ठरवतात त्यामुळे शेतकऱ्यांची आजही अडवणूक सूरू आहे या सर्व गोष्टींवर मात करावयाची असेल आणि केंद्र व राज्य सरकारांना शेतकरी हा आत्मनिर्भय करावयाचा असेल तर २०२० पर्यंत खालील बाबी उपलब्ध करून देणे अनिवार्य राहिल.

१. कृषी उत्पन्न बाजार समितींमध्ये मोठ्या प्रमाणावर साठवणूक सुविधा उपलब्ध व्हायला पाहिजे.
२. स्टोरेज करण्यासाठी वातानूकुलीत उष्ण अशा वेगवेगळ्या प्रकारच्या सोयी त्या ठिकाणी असाव्यात.
३. साठवणूक केलेल्या मालावर लगेच त्याला आर्थिक क्रेडीट मिळायला हवे व आर्थिक क्रेडीट संस्था शासनाची असावी.
४. आमदार निवासात मिळणाऱ्या अल्पदरातील व्यवस्थेनूसार कृषीबाजार समितीत जेवणाची व्यवस्था असावी तसेच निवासाची व्यवस्था असावी.
५. किसान ओळपत्रे राष्ट्रीय पातळीवर तयार करून ती शेतकऱ्यांना देशभर उपयोगी पडतील अशी असावीत.
६. शेतकरी आपला माल देशभरात कोणत्याही राज्यात कोणत्याही मार्केटमध्ये विकू शकेल अशी सुविधा असावी.
७. वेळी-अवेळी पर्यावरणामुळे पावसामुळे खराब होणारे अन्न-धान्य शासनाने हमी भावात खरेदी करावे.
८. शेतकऱ्यांना घरबसल्या बाजार भावांचे विवरण (माहिती) सहजपणे उपलब्ध होण्यासाठीची प्रक्रिया सुलभ व्हावी.

आर्थिक गरजेपोटी शेतकरी आपला माल ताबडतोब विक्री करण्यास तयार होतो ही बाब लक्षात घेऊन शासनाने आर्थिक निकषावर आधारित बाजार व्यवस्था निर्माण करून शेतकऱ्यांना पाहिजे जेव्हा माल विकता येईल अशी कृषि विपनन व्यवस्था निर्माण करणे २०२० पर्यंत आवश्यक आहे तरच शेतकरी वर्चस्व असलेली विपनन व्यवस्था निर्माण होईल.

## समारोप -

धुळे जिल्ह्यातील बाजार समितीने कामकाजात आधुनिकतेचा वापर करीत कामकाजाला गती दिली आहे.विविध प्रकारच्या कामातून शेतकरी, हमाल-मापाडी, व्यापारी यांच्यात समन्वय घडवून आणून सातत्याने आपल्या प्रगतीचा आलेख वाढत ठेवला आहे.जिल्ह्यातील बाजर समितींमध्ये माथाडी कायद्याची अंमलबजावणी बाबतही कार्यवाही सूरू करण्यात आली आहे. तसेच सर्व बाजार समित्या स्वतःच्या जागेवर भव्य वास्तूत सुरु आहेत तर काहींना जागा कमी पडत असल्याने त्यांच्याकडून अधिक जागा खरेदी करून त्याठिकाणी उपबाजार समिती सूरू करण्यात आलेल्या आहेत जसजशी बाजार समितींच्या व्यवहारांमध्ये वाढ होत आहे त्यानुसार त्यांच्या उत्पन्नात भर पडून त्याद्वारे समिती प्रगती साधत आहेत अनेक ठिकाणी गोदामांची उभारणी करून त्यामध्ये शेतकऱ्यांच्या, व्यापाऱ्यांच्या माल ठेवण्याची सोय करण्यात येते. तर काही बाजार समित्यांनी आपल्याच आवारात शॅापिंग सेंटर बांधून त्याठिकाणी आडत्यांना दुकाने दिल्याने व्यापाऱ्यांसह शेतकऱ्यांची सोय झालेली आहे. परंतू समितींनाही आर्थिक उत्पन्नाचे कायमस्वरूपी साधन उपलब्ध आहे भविष्यातही या समितींमार्फत अनेक चांगल्या योजना राबविण्याचा संकप्ल करण्यात आला असून त्या दृष्टिने जिल्ह्यातील बाजार समिती वाटचाल करीत असून भविष्यात या समित्या आर्थिकदृष्ट्या अधिक संपन्न झाल्याचे आपल्याला पाहायला मिळणार आहे.

## संदर्भ :

१. धाराशिवक मुकुंद आणि सहकारी : समर्थ धुळे जिल्हा २०२० खंड पहिला प्रकाशन - समर्थ भारत व्यासपीठ
२. धाराशिवकर मुकुंद आणि सहकारी प्रगती च्या पाऊलवाटा भाग १ जलसंवाद प्रकाशन - पुणे
३. गर्गे स.मा. समाजविज्ञान आणि संस्कृती, मौज प्रकाशन - मुंबई
४. कुलकर्णी अ.रा संस्कृतीचा इतिहास, सुविचार, प्रकाशन -पुणे
५. अवचट अनिल माणसं मौज प्रकाशन - मुंबई
६. जोशी व. शं. - महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री अधिनियम, १९६३ ज्ञानदिप प्रकाशन -पुणे.
७. जोशी लक्ष्मणशास्त्री - मराठी विश्वकोष खंड ५, प्रकाशन -सचिव महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई
८. उपरोक्त -२
९. दै. लोकमत वृत्तपत्र - सोमवार दि. २ मार्च २००९ (जळगाव आवृत्ती)